# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.07.2026** **वारःरविवार**

---

- **इंडोनेशिया, ऑस्ट्रेलियासह न्यूझीलंडचा दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी दाखल**
- **व्हिएतनाममधील बोट दुर्घटनेत 15 भारतीयांचा मृत्यू**
- **पुण्यातील मोशी इथल्या दुर्घटनेतील मृतांची संख्या नऊ**
- **इंग्लंड विरुद्ध एकमेव क्रिकेट कसोटी सामन्यात भारतीय महिला संघाला विजयाची संधी आणि**
- **फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत नॉर्वेला हरवून इंग्लंड उपांत्य फेरीत.**

**<u>पं.प्र मायदेशी</u>**

इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी दाखल झाले आहेत. या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यातील त्यांची न्यूझीलंड भेट ऐतिहासिक ठरली. चार दशकांहून अधिक काळानंतर भारतीय पंतप्रधानांनी न्यूझीलंडचा केलेला हा दौरा द्विपक्षीय संबंधांना मोठी चालना देणारा ठरला. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदींनी न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्याशी चर्चा केली. संरक्षण, पर्यटन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन तसंच दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन या पाच क्षेत्रांमध्ये यावेळी 10 सामंजस्य करार करण्यात आले. ऑकलण्ड मध्ये भारतीय वंशाच्या 10 हजार नागरिकांच्या उपस्थितीत स्पार्क एरिना इथं झालेला कार्यक्रम या दौऱ्याचं प्रमुख आकर्षण ठरला. या कार्यक्रमात भारत एक विश्वासू मित्र असल्याचं लक्सन यांनी नमूद केलं आणि पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाचं कौतुकही केलं. हा दौरा भारत आणि न्यूझीलंड संबंधांमध्ये एक नवीन अध्याय सुरू करेल असा विश्वास मोदी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

**<u>शिवराजसिंह</u>**

दिल्लीत होणाऱ्या पर्यावरण संरक्षण संकल्प कार्यक्रमात आज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह सहभागी होणार आहेत. देशभरातून सहभागी होणाऱ्या 17 हजार वृक्ष मित्रांशी ते संवाद साधणार आहेत. सक्रिय जनसहभागातून पर्यावरण संरक्षणाचे रूपांतर देशव्यापी लोकचळवळीत करण्याचं आवाहन सिंह या मित्रांना करतील. त्यानंतर पुसा परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमातही ते सहभागी होतील.

**<u>वैष्णव-हैदराबाद</u>**

हैदराबादला एक प्रमुख 'हाय-स्पीड रेल हब' म्हणून विकसित करणार असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. हैदराबादला पुणे, चेन्नई आणि बेंगळुरूशी जोडणारे 'बुलेट ट्रेन कॉरिडॉर्स' उभारले जाणार आहेत. या हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कमुळं प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि दक्षिण भारतातील प्रमुख आर्थिक केंद्रांमधील संपर्क व्यवस्था अधिक बळकट होईल, असं वैष्णव म्हणाले. ते काल हैदराबादमध्ये एका

कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी देशातील वाढत्या इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्रांवरही प्रकाश टाकला.

**PMFME**

'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत देशभरातील दोन लाखांहून अधिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना कर्ज मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या योजनेमुळं 20 हजार 300 कोटी रुपयांहून अधिक प्रकल्प गुंतवणूक झाली असून, जवळपास 11 लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. देशाच्या अन्न प्रक्रिया क्षेत्राच्या विकासासाठी हा एक भक्कम पाया असल्याचं केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान म्हणाले. नवी दिल्ली इथं काल आयोजित एका विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. एकूण लाभार्थ्यांपैकी महिला उद्योजकांचं प्रमाण जवळपास 44 टक्के आहे, असंही पासवान यांनी अधोरेखित केलं.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**व्हिएतनाम-अपघात**

व्हिएतनाममधील 'फू क्वोक' बेटाजवळ काल भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक स्पीडबोट उलटली. या दुर्घटनेत 2 महिलांसह 15 भारतीयांचा मृत्यू झाला. स्थानिक प्रशासनानं 21 जणांना वाचवलं. व्हिएतनाममधील भारतीय दूतावासानं मृतांची यादी जाहीर केली असून मृतांपैकी 10 जण तामिळनाडूचे, 3 जण आंध्र प्रदेशचे आणि 2 जण केरळमचे आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस, जयशंकर यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**मोशी**

पुण्यातील पिंपरी-चिंचवडमधील मोशी कचरा डेपो इथं झालेल्या दुर्घटनेमध्ये काल शोधमोहीमेदरम्यान इमारतीत आढळलेल्या 8 जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेमध्ये 9 जणांचा मृत्यू झाला आहे. या कचरा डेपोमध्ये 8 जुलै रोजी कचऱ्याचा ढीग 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून गंभीर दुर्घटना घडली होती. दरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या शोधकार्याची पाहणी केली. तसेच दुर्घटनेत बाधित झालेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. प्रशासनामार्फत सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही पवार यांनी दिली. दुर्घटनेच्या कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असंही पवार यांनी म्हटलं आहे.

**स्वीगी**

एफ-एस-एस-ए-आय अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने स्विगी इन्स्टामार्ट या खाद्य पदार्थ पोहोच करण्याची सेवा देणाऱ्या कंपनीला 9 नोटिसा बजावल्या आहेत. या कंपनीने अन्न सुरक्षा आणि मानक कायद्याचं उल्लंघन केल्याच्या अनेक तक्रारीं आल्या होत्या. स्विगी इन्स्टामार्टमार्फत मुदत संपलेल्या खराब झालेल्या दूषित आणि इतर असुरक्षित अन्न पदार्थांचा पुरवठा करण्यात आला अशा तक्रारी आहेत.

**इराण-अमेरिका**

इराण-अमेरिका तणाव आणखी वाढला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत सायप्रसच्या ध्वजाखालील मालवाहू जहाजावर इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सनं हल्ला केल्यानंतर अमेरिकेनं इराणवर नव्याने हवाई हल्ले केले आहेत. हे हल्ले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्देशानुसार करण्यात आल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं म्हटलं आहे. दरम्यान, इराणनं होर्मुझ सामुद्रधुनी पुढील आदेशापर्यंत बंद करण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेचा हस्तक्षेप संपेपर्यंत या सामुद्रधुनीतून कोणत्याही जहाजाला मार्गक्रमण करू दिलं जाणार नसल्याचं इराणच्या नौदलानं स्पष्ट केलं आहे. सामुद्रधुनी खुली असल्याची आणि व्यापारी जहाजांवर हल्ले होणार नसल्याची घोषणा इराणनं करावी, अशी मागणी अमेरिकेनं केली आहे. दरम्यान तणावपूर्ण परिस्थिती असूनही इराणबरोबरच्या वाटाघाटी सुरू राहतील, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<u>मुख्यमंत्रि विशेष रेल्वे</u>**

बोधगया ही भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांची प्रेरणाभूमी आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये केलं. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यासह राज्यातील अन्य जिल्ह्यांतील लाभार्थ्यांना बिहारमधील महाबोधी विहार, बोधगया इथं घेऊन जाणाऱ्या विशेष रेल्वेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. राज्य शासनानं सर्व धर्मांतील ज्येष्ठ नागरिकांना मोफत तीर्थदर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू केली आहे. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील 800 लाभार्थी 11 ते 16 जुलै या कालावधीत विशेष रेल्वेनं महाबोधी विहार, बोधगया बिहार इथं तीर्थयात्रेसाठी रवाना झाले.

**<u>एकदेशएकनिवडणूक</u>**

एक देश एक निवडणूक या प्रस्तावाशी संबंधित विधेयकांची छाननी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचं दोन दिवसीय चर्चासत्र गोव्यात झालं. संविधान 129 वी घटनादुरुस्ती विधेयक 2024 आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरूस्ती विधेयक 2024 या दोन विधेयकांवर चर्चा करण्यात आली. एकत्रित निवडणुकांमुळे खर्चात कमी होईल आणि प्रशासन सक्षण होण्यास मदत होणार आहे असं समितीचे अध्यक्ष आणि खासदार पी. पी. चौधरी यांनी सांगितलं.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

लंडनमध्ये लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळल्या जाणाऱ्या ऐतिहासिक आणि एकमेव महिला कसोटी सामन्यात, भारतानं इंग्लंडचा पहिला डाव 170 धावांत गुंडाळून पहिल्या डावात 115 धावांची आघाडी घेतली आहे. दुसऱ्या डावातही भारतानं  दमदार सुरुवात करत काल दुसऱ्या दिवस अखेर एका खेळाडूच्या मोबदल्यात 154 धावा केल्या. स्मृति मानधना 69 तर यास्तिका भाटिया 39 धावांवर खेळत आहे. भारताकडं एकंदर 269 धावांची आघाडी असून सामन्याचे 3 दिवस बाकी असल्यानं भारताला विजयाची संधी आहे. प्रतिष्ठित लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळली जाणारी ही पहिलीच महिला कसोटी असल्यानं हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

**<u>पुरुष-क्रिकेट</u>**

पुरुष क्रिकेटमध्ये, काल रात्री इंग्लंड मधील साऊथम्प्टन इथं झालेल्या पाचव्या आणि अंतिम टी-20 सामन्यात इंग्लंडनं भारताचा 56 धावांनी पराभव करून करून पाच सामन्यांची मालिका 4-0 अशी जिंकली.

इंग्लंडनं विजयासाठी दिलेल्या 258 धावांच्या आव्हानासमोर भारताला निर्धारित 20 षटकांत 8 बाद 201 धावाच करता आल्या. दोन्ही संघांमधील पहिला टी-20 सामना पावसामुळं अनिर्णित राहिला होता.

**<u>फिफा</u>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत फ्लोरिडातील मियामी स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार आज पहाटे झालेल्या सामन्यात इंग्लंडनं नॉर्वेचा 2-1 असा पराभव करून उपांत्य फेरीत गाठली आहे.

**<u>विम्बल्डन</u>**

टेनिसमध्ये, लंडनच्या सेंटर कोर्टवर काल रात्री झालेल्या विम्बल्डन महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात, 21 वर्षीय लिंडा नोस्कोव्हानं आपल्याच देशाच्या कॅरोलिना मुचोव्हाचा 6-2, 5-7, 6-3 असा पराभव करून पहिलं ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावलं.

पुरुष एकेरीच्या आज रात्री होणाऱ्या अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला यानिक सिनर जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हचा सामना करेल.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं देशाच्या उत्तर आणि पूर्व भागात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीत बातमीपत्र संपलं, नमस्कार.